# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पनवेल (जि.रायगड) येथील वेळेचे बंधन न पाळणाऱ्या मद्यविक्री अनुज्ञप्त्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१) ४८ (०२-०४-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात देशी व विदेशी दारूची दुकाने सकाळी १० वाजता सुरु करण्याचा नियम असताना रायगड जिल्ह्यातील पनवेल तसेच नवीन पनवेल सिडको वसाहतीतील देशी व विदेशी दारूची दुकाने पहाटे ६ वाजल्यापासून सुरू करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशी व विदेशी दारूच्या दुकानांसाठी निश्चित वेळापत्रक ठरलेले असून सुद्धा संबंधीत विभागातील राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे दुकानदार सर्रासपणे नियमांचे उल्लघंन करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमांचे उल्लघंन करून पहाटेच्या वेळी देशी व विदेशी दारूची विक्री करणाऱ्या दुकानदारांवर कारवाई करण्यासाठी सर्वधर्म सेवा समिती या संस्थेने वारंवार जिल्हाधिकारी, रायगड अलिबाग यांच्याकडे तक्रार करुनही अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नियमांचे उल्लघंन करून पहाटेच्या वेळी देशी व विदेशी दारूची विक्री करणाऱ्यां दुकानदारांवर कारवाई करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-०९-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

विहीत वेळेनंतर अनुज्ञप्त्या कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यावर कारवाई करण्यात येते.

(३) अशा प्रकारची कोणतीही तक्रार जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाही.
(४) पनवेल परिसरातील मद्यविक्री अनुज्ञप्त्या विहीत वेळेत सुरू/बंद करण्यात येतात अथवा कसे याबाबत वेळोवेळी मोहिम राबविण्यात येत असून वेळेचे बंधन न पाळणा-या अनुज्ञप्त्यांवर कारवाई करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयात लाकुड तस्करीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत**

**(२) १४२ (२८-०७-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात वन विभागामार्फत करण्यात येणारी कारवाई बंद झाल्याने लाकुड तस्करी मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, वन संरक्षण कर्मचारी कार्यालयात हजर नसल्याने लाकुड तस्करी मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले असून तस्करी करणाऱ्यांवर भरारी पथकाद्वारे कारवाई करण्याबाबत नियोजन केले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, संपूर्ण प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबधित दोषींवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच तस्करीला आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२८-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विदर्भात आदिवासी माना समाजाच्या नागरिकांच्या प्रलंबित असलेल्या जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत**

**(३) ३३२ (०९-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील विदर्भातील बहुतांश ग्रामीण आदिवासी भागात विखुरलेल्या माना समाजाच्या नागरिकांचे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळणे प्रलंबित असल्याबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माहे फेब्रुवारी-मार्च, २०१९ पासून माना समाजाच्या नागरिकांच्या शैक्षणिक कार्यासाठी फक्त विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र देणे सुरु केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जात पडताळणी प्रमाणपत्र शैक्षणिक कार्यासाठी फक्त विद्यार्थ्यांना देतांना मा.न्यायालयाच्या नोंदीचा उल्लेख करून देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर माना जात पडताळणी प्रमाणपत्र देतांना जुन्या प्रलंबित असलेल्या, नोकरीच्या व अन्य प्रकरणात निर्णय त्वरेने घेवून प्रमाणपत्रे वितरीत करण्याची मागणी माना समाज कृती समिती नागपूर यांचेकडून दिलेल्या पत्रान्वये होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, माना समाजाला जात पडताळणी प्रमाणपत्र देतांना फक्त ज्या उमेदवारांना नोटीस मिळालेल्या आहेत फक्त अशा उमेदवारांनाच माना समाजाचे प्रमाणपत्र न देता सर्व समाजातील नागरिकाना जात प्रमाणपत्र मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०६-१०-२०२०) :** (१) होय.

(२) व (३) नाही.

(४) व (५) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांमार्फत अधिनियम २००० व नियम २००३ मधील तरतूदीनुसार अनुसूचित जमातीच्या दाव्यांची पडताळणी करण्यात येते. समित्यांकडे प्रलंबित असलेली सर्व प्रकारची प्रकरणे कालबध्द पध्दतीने निकाली काढण्यासाठी गती अभियान राबविण्याबाबत समित्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार समित्यांमार्फत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**अवकाळी पावसाने बाधित झालेल्या शेतक-यांना शासनाने जाहिर केलेली आर्थिक मदत**

**(४) ५६९ (०५-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे सुमारे ७० लाख हेक्टरवरील शेतीपिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेल्या शेतक-यांना त्वरीत दहा हजार कोटी रुपयांची मदत देण्याची घोषणा तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना आर्थिक मदतीची घोषणा करुन दोन आठवडे होऊनही राज्याच्या वित्त विभागाकडे मदतीचा कोणताच प्रस्ताव पोहचला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषगाने नुकसानग्रस्तांना त्वरीत मदत मिळण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०९-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) व (३) राज्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या क्यार व महा चक्रीवादळामुळे झालेल्या अवेळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना चार टप्प्यात रूपये ७६४४४७.६९ लक्ष निधीचे वितरण आतापर्यंत करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्याबाबत

**(५) १०९६ (०२-०४-२०२०). श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सामाजिक न्यायअ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील १ हजार २४३ विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्ती जमा करण्यात आली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील ८७ हजार ८०१ विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, डी.बी.टी. पोर्टलमध्ये काही त्रुटी असल्याने शिष्यवृत्तीची रक्कम खात्यात जमा झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०८-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही, विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न नसणे, बँक खाते बंद असणे, आधारसंलग्न मोबाईल क्रमांक बंद असणे, विद्यार्थ्यांनी रिडीम केलेले नसणे, दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज महाविद्यालयास्तरावर प्रलंबित असणे इ. कारणास्तव विद्यार्थ्यांच्या खात्यात शैक्षणिक लाभाची रक्कम जमा होण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(४) सन २०१९-२० या वर्षामध्ये महाडीबीटी पोर्टलवर पुणे जिल्हयाअंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती/ फ्रिशिपच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशिल खालील प्रमाणे :-

- नोंदणी झालेले अर्ज :- ४५,०००
- पात्र अर्ज संख्या :- ३५,०००
- महाविद्यालयांनी मंजूर केलेले अर्ज :- ३४,२०४
- जिल्हास्तरावर मंजूर केलेले अर्ज :- ३४,२०४
- देयके मंजूरीची अर्ज संख्या :- ३३,४११
- देयके मंजूरीची रक्कम :- रुपये २,११,१४,७८,०००/-
- २८,४०१ विद्यार्थ्यांच्या बॅन्क खात्यावर जमा झालेली रक्कम १,९६,८०,४१,०००/-
- महाडीबीटी प्रणालीवरील (Pool account) व PFMS या प्रणालीव्दारे ५,०१० विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक लाभाच्या रुपये १४,३४,३८,०००/- इतक्या रक्कमेच्या वितरणाची प्रक्रिया चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गृहनिर्माण संस्थांच्या छतावरील सौरऊर्जा नेटमिटरिंग पॉलिसीबाबत**

**(६) १६८७ (०२-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेली चार वर्षे सुरु असलेली छतावरील सौरऊर्जा नेटमीटरिंग पॉलिसी बंद करुन महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (एम.ई.आर.सी.) नवी पॉलीसी दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास मंजूर केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छतावरील पॅनलद्‌वारे सौरऊर्जा घेऊन ती महावितरणाच्या मीटरला जोडणा-या ग्राहकांकडून प्रतियुनिट तब्बल ४.४६ ते ४.७३ रुपये आकारण्याचा प्रस्ताव महावितरणाने दिला हे खरे आहे काय, तसेच "ग्रीड सपोर्ट" शुल्काच्या नावाखाली ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२१-०९-२०२०) :** (१) हे खरे आहे. मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने “ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छपरावरील नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा, विनियम २०१९” दि.३० डिसेंबर, २०१९ रोजी जाहीर केले आहे.

(२) सदर विनियमातील कलम ११.५ नुसार नेट मिटरींग घेणा-या ग्राहकांना ग्रीड सपोर्ट शुल्क लागू करण्याची तरतूद आहे. या तरतुदीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीने आर्थिक वर्ष २०२०-२१ ते सन २०२४-२५ या कालावधीसाठी मा.आयोगाकडे सादर केलेल्या वीज दर याचिकेत ग्रीड सपोर्ट आकार प्रस्तावित केला होता. परंतु मा.आयोगाने नेट मीटरींगचा पर्याय घेणा-या ग्राहकांना ग्रीड सपोर्ट आकार लागू केलेला नाही. त्यामुळे ते आकारण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह केलेल्या दाम्पत्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत**

**(७) १८३१ (०३-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील आंतरजातीय विवाह केलेल्या ५४४ दाम्यत्यांना सन २०१७ पासून अद्यापपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान मिळाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेतंर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानातुन केंद्र आणि राज्याचा निम्मा निम्मा हिस्सा असून केंद्रातून माहे जुलै, २०१७ पासून ५० टक्के हिश्शाचा निधी प्राप्त झालेला नाही त्यामुळे अनुदान देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन केंद्र शासनाकडून ५० टक्के हिश्शाचा निधी प्राप्त करुन लाभार्थ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२१-०९-२०२०) :** (१) होय.
(२) होय, अंशतः खरे आहे, केंद्र शासनाकडून यापूर्वी अपुरा निधी प्राप्त झालेला होता. त्याचप्रमाणे सन १९-२० या आर्थिक वर्षामध्ये मार्च दरम्यान निधी प्राप्त झाल्याने कोविडच्या परिस्थितीत सदर निधी खर्च झालेला नाही.
(३) या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून ५०% केंद्र हिस्सा प्राप्त होताच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील, त्यानुषंगाने शासनाचा ५०% केंद्र हिस्सा प्राप्त होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उजनी जलाशयावर तरंगत्या स्वरुपात उभारण्यात येणाऱ्या सौरऊर्जा प्रकल्पाबाबत**

**(८) २०१८ (०२-०४-२०२०). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जमिनीवरील उपलब्ध नैसर्गिक स्त्रोतांच्या वीज निर्मिती शिवाय केरळ राज्याने सुरु केलेल्या जलाशयावरील वीज प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर उजनी जलाशयात तरंगत्या स्वरुपात सौरऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीसाठी योजना आखली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उजनी जलाशयावर तरंगत्या स्वरुपात सौरऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीची आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विज वितरणाची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पामुळे जलाशयाला व मासेमारी करणारे मच्छीमार यांना बाधा न पोहचवता व पर्यटक वाढीसाठी कोणता विचार करण्यात आला आहे, असल्यास त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) तसेच, या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कायवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२२-०९-२०२०) : (**१) व (२) उजनी जलाशयावर तरंगत्या स्वरुपात १००० मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणीकरीता दि.२४.१२.२०१८ रोजी स्पर्धात्मक प्रक्रियेद्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने निविदा रद्द करण्यात आली.
(३) व (४) लागू नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील मुलांच्या शासकीय वसतीगृहाकरिता स्वतंत्र इमारत मंजूर करण्याबाबत**

**(९) २३८९ (०३-०४-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा (जिल्हा बुलढाणा) तालुक्यातील मुलांचे शासकीय वसतीगृह भाड्याच्या इमारतीमध्ये सुरू असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसतीगृहातील मुलांसाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक सोयी सुविधा या इमारतीमध्ये उपलब्ध नसल्याने वसतिगृहातील मुलांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या गैरसोयीमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासावर देखील फरक पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नांदुरा तालुक्यातील मुलांच्या शासकीय वसतीगृहासाठी सर्व भौतिक सोयी-सुविधा असणारी स्वतंत्र इमारत मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०९-१०-२०२०) :** (१) होय.
(२) व (३) नाही.
(४) वसतिगृह इमारत बांधकामासाठी मौजे नांदुरा येथे सर्वे नं २८ मधील ३.८४ हे.आर जमिनीपैकी ०.८० आर जमीन उपलब्ध झाली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खामगांव( जि.बुलढाणा) येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१०) २५४९ (१४-०४-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव( जि.बुलढाणा) येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे हजारो हेक्टर शेतीच नुकसान झाले असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खामगांव तालुक्यातील ७३१९६.९४ हेक्टर तसेच खामगांव व शेगांव तालुक्यातील अशी एकुण १ लाख हेक्टर जमीनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नुकसानग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०९-०९-२०२०) :** (१) होय हे खरे आहे,
(२) होय हे खरे आहे,
(३) हे खरे नाही,
खामगाव तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना मदत वाटप करण्याकरिता रूपये ५३,५२,१०,३००/- व शेगाव तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांना रूपये २९,६४,३१,४७०/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गत वर्षात झालेल्या अतिवृष्टी व पूर बाधितांच्या मदतीसाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेली आर्थिक मदतीची मागणी

**(११) २७५५ (०९-०४-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ),**

**श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील वर्षात पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टी व पूर बाधितांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे ७,२८८ कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणी पैकी केवळ ९२७ कोटी रुपयांची मदत केंद्र शासनाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात विशेतः कोल्हापूर, सांगली, पालघर जिल्ह्यात, कोंकणात जुलै-ऑगस्ट, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व महापूरामुळे ७२८८ कोटीचे नुकसान झाले, यामध्ये शेतीचे ३५७६ कोटी, रस्ते, पुल, इमारती अशा पायाभुत सुविधांचे २,६६७ कोटी रुपयांचा समावेश असल्याबाबत राज्य शासनाने केंद्राला मदत मिळावी असा प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, केंद्र शासनाकडून आलेल्या तुटपुंज्या आर्थिक मदतीवर अवलंबून न राहता शासनाने नुकसानगस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०९-०९-२०२०) :** (१) होय हे खरे आहे,

(२) केंद्र शासनाने रूपये ९५६.९३ कोटी मदत केली आहे.

(३) होय

(४) राज्यात जुलै-ऑगस्ट, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व महापुरामुळे बाधित झालेल्या कुटुंबांना आर्थिक मदतीसाठी वेगवेगळ्या बाबींकरीता आतापर्यंत वेळोवेळी रूपये ११८३७५.४९ लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील अत्यल्प, अल्पभुधारक व इतर अनेक शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेतंर्गत कर्जमाफी देण्याबाबत**

**(१२) २८७५ (०३-०४-२०२०). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील अत्यल्प, अल्पभुधारक व इतर अनेक शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेतंर्गत कर्जमाफीसंदर्भात आलेल्या तक्रारीचा निपटारा करण्यासाठी तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीकडे आतापर्यंत ८८१ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन आतापर्यंत किती शेतकरी कर्जमाफीकरिता पात्र तसेच अपात्र ठरले आहेत,
(४) तसेच पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०९-२०२०) :** (१) व (२) होय.
(३) व (४) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत गठीत करण्यात आलेल्या कळमनुरी तालुक्यातील तालुकास्तरीय समितीकडे ८८१ प्राप्त तक्रारी पैकी ११ शेतकऱ्यांना पात्र ठरवून लाभ दिलेला आहे, ५१ शेतकऱ्यांना पात्र ठरवून संबंधीत बँकेस पुन्हा शेतकऱ्यांचा डाटा अपलोड करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत, एक शेतकरी एकरक्कमी योजनेअंतर्गत पात्र असूनही त्याने एकरक्कमी परतफेड योजनेमध्ये त्याचा स्वहिस्सा भरलेला नसल्यामुळे त्यास लाभ देण्यात आला नाही, ७५१ शेतकरी संबंधीत बँकेच्या अभिलेखानुसार अपात्र ठरले आहेत व उर्वरीत ६७ तक्रार अर्जावर बँकांमार्फत कार्यवाही सुरु आहे.
सदर योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना कर्जमाफी देण्याची प्रक्रिया सुरु असून सद्यस्थितीत ४४.०४ लाख कर्ज खात्यांवर रु. १८,७६१.७५ कोटी लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी नायकडा समाजाला जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**(१३) २९४२ (०२-०४-२०२०). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी नायकडा समाजाला जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याबाबत तसेच शासन निर्णय काढण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०६-१०-२०२०) :** (१) होय.
(२) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० व महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन नियम २००३ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत अनुसूचित

जमातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच अधिनियम २००० मधील कलम ८ नुसार दावा सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणाऱ्या अर्जदार आहे. सदर अधिनियम व नियम हे सर्व अनुसूचित जमातींसाठी लागू आहेत.

लोक प्रतिनिधींच्या दिनांक १७ डिसेंबर, २०१९ च्या निवेदनाच्या अनुषंगाने नायकडा समाजातील लोकांना जात प्रमाणपत्र देण्यासंदर्भात अधिनियम २००० व नियम २००३ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागाच्या महाडीबीटी पोर्टल मधील त्रुटींबाबत**

**(१४) ३०२२ (०३-०४-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या महाडीबीटी पोर्टल मधील त्रुटीमुळे तंत्रविद्यानिकेतनमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त फी भरावी लागत असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मलकापूर (जिल्हा बुलढाणा) तालुक्यातील डॉ.व्ही.बी कोणते कॉलेज ऑफ इंजिनीरिंग मध्ये प्रवेश घेतलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सदर पोर्टलच्या त्रुटीमुळे मोठी आर्थिक झळ सोसावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त त्रुटीमध्ये दुरुस्ती करणेबाबत वारंवार सूचना करुन देखील अद्यापपर्यंत महापोर्टलमधील त्रुटी निकाली काढण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन महाडीबीटी पोर्टलमधील त्रुटी दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०८-०९-२०२०) :** (१) होय.

(२) अंशत: होय.

(३) हे खरे नाही.

(४) विविध महाविद्यालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या वैविध्यपुर्ण उपक्रमामुळे इतर शुल्काच्या बाबीमध्ये वाढ झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने तसेच इतर बाबनिहाय फीमध्ये विविध महाविद्यालय / विद्यापिठनिहाय मोठ्या प्रमाणा वर मतभिन्नता असल्याने माहिती तंत्रज्ञान विभागाने सर्व महाविद्यालयांकडून माहिती मागवून सर्व प्रशासकीय विभागांसाठी सर्वसंमतीने इतर शुल्काच्या १६ बाबी निश्चित केलेल्या असून, त्या माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत महाडीबीटी पोर्टलवर देखील अपलोड करण्यात आलेल्या आहेत.

त्यानुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक १५ जानेवारी, २०२० च्या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० पासून महाडिबीटी प्रणालीव्दारे अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना, भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतीपुर्ती

योजनेअंतर्गत शैक्षणीक लाभ महाडीबीटी प्रणालीव्दारे अदायगीसाठी इतर शुल्काच्या एकुण १६ बाबी निश्चित केलेल्या असुन, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील शासकीय वसतीगृहाच्या इमारतीचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(१५) ३०५६ (०३-०४-२०२०). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यात मुला व मुलींची प्रत्येकी दोन वसतीगृह खाजगी इमारतीमध्ये असल्यामुळे विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या शैक्षणिक गुणवत्तेवर, इतर सोयी-सुविधांवर व सुरक्षेबाबत समस्या निर्माण होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यात गुणवंत मुलांच्या वसतीगृहासाठी नांदेड दक्षिण येथील धनगरवाडी येथे सन २०१६-१७ मध्ये शासनाने मान्यता दिली असून देखील वसतीगृहांचे काम अद्यापही पुर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २०१८-१९ मध्ये २०० विद्यार्थ्यांच्या विशेष वसतीगृहांसाठी शासनाने बांधकामाची परवानगी दिलेली असून त्यांच्या बांधकामास देखील अद्याप सुरुवात झालेली नसल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वसतीगृहाच्या शासकीय इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२८-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर इमारतीचे बांधकाम हे अंतिम टप्यात असून संरक्षण भिंतीचे बांधकाम सुरू आहे. बांधकाम पूर्ण होताच इमारत ताब्यात घेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) शासन निर्णय दि.१२/३/२०१८ अन्वये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे (२०० मुलांचे) शासकीय वसतिगृह बांधकामास अंदाजपत्रकानुसार रू.१९.३५ कोटी तरतूद मंजूर करण्यात आली आहे.त्यापैकी रू.३.०० कोटी इतकी तरतूद कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे दि. १०/६/२०१९ रोजी वर्ग करण्यात आली आहे. सदरील इमारतीच्या नकाशामध्ये दुरूस्तीबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला असून त्यावर कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### "सहकारांतर्गत सहकार" या तत्वानुसार सक्षम, कमकुवत सहकारी संस्थाच्या बळकटीकरणासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१६) ३२१४ (०३-०४-२०२०). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "सहकारांतर्गत सहकार" या तत्वानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६९ मधील तरतुदी अन्वये पालघर जिल्ह्यातील सहकारी संस्थाची त्यांच्या आर्थिक वर्षात होणाऱ्या निष्फळ नफ्यातुन २०% पर्यंत नफ्याची रक्कम सहकारी, धर्मदाय किंवा सार्वजनिक जनहितार्थ विहीत केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे वापरले जात नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील एकुण किती सहकारी संस्थानी प्रश्न भाग १ मधील कार्यपद्धतीचे पालन केलेले नसल्याचे चौकशीअंती आढळून आले आहे,

(३) असल्यास, संबंधित दोषी सहकारी संस्थावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०७-१०-२०२०) :** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६९ अन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी अशंदान या करीता तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीनुसार कलम ६६ व कलम २४ अ प्रमाणे तरतूदी करण्यात आल्यावर संस्थेस आपल्या निव्वळ नफ्याच्या वीस टक्क्यांहून अधिक नाही इतकी रक्कम सार्वजनिक प्रयोजनार्थ अंशदान यासाठी काढून ठेवता येईल. मात्र, सदर तरतूद बंधनकारक नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण राजापूर (जि.रत्नागिरी) येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन बँक खात्यामार्फत सुरु करण्याबाबत

**(१७) ३३५५ (१८-०४-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरणच्या राजापूर (जि.रत्नागिरी) विभागामध्ये गेली १५ ते २० वर्षे ठेकेदारी पध्दतीने सुरु केलेल्या कंत्राटी काम करणा-या कर्मचा-यांचे ठेकेदारांकडून आर्थिक शोषण सुरु असल्याची बाब माहे जानेवारी,२०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठेकेदारी पध्दत बंद करुन कंत्राटी कर्मचा-यांचे वेतन थेट त्यांच्या बँकेच्या खात्यामार्फत सुरु करण्याबाबतची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ठेकेदाराकडून होणारे आर्थिक शोषण रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०६-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ३० लाख पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळण्याबाबत**

**(१८) ३३९३ (०२-०४-२०२०). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत राज्यातील ५० लाख शेतकऱ्यांना दिड लाख पर्यंतची कर्जमाफी जाहिर केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज भरुन घेण्यात आले असून बँककडूनही अहवाल मागविण्यात आला तसेच अर्ज व बँकेचा अहवाल यातील माहितीमध्ये असलेली तफावत या त्रुटी दुरुस्त करण्याचे काम अजुनही पुर्ण न झाल्याने दोन वर्ष होवूनही पात्र शेतकरी कर्जमाफी पासुन वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या कर्जमाफीनुसार ५० लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी २४ हजार कोटींची तदतूद करण्यात आली आहे, तद्नुसार सुमारे २० लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला असून ३० लाख पात्र शेतकरी अद्यापही कर्जमाफी पासून वंचीत राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कर्जमाफीस पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२२-०९-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.
छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ योजनेअंतर्गत जानेवारी, २०२० अखेर ५०.५९ लाख कर्जखात्यांमध्ये लाभ मंजूर करण्यात आला आहे.
(२) व (३) नाही.
सद्यस्थितीत ४४.०४ लाख कर्ज खात्यांवर रु. १८,७६१.५५ कोटी लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देसाईगंज (जि.गडचिरोली) तालुक्यातील जनाबाई मुलींचे वसतीगृहात विद्यार्थिनीचा झालेला मृत्यु

**(१९) ३५३२ (०३-०४-२०२०). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देसाईगंज (जि.गडचिरोली) तालुक्यातील जनाबाई मुलींचे वसतीगृहातील इयत्ता ११ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या कु.पल्लवी वासुदेव चोपडे या विद्यार्थीनीचा वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यु झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतीगृहात प्रशासनाचा गैरकारभार व हलगर्जीपणमुळे विद्यार्थीनीचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१०-०९-२०२०) :** (१) नाही.

कु.पल्लवी वासुदेव चोपडे ही विद्यार्थीनी जनाबाई कन्या अनुदानित वसतिगृह देसाईगंज येथे प्रवेशित होती. सदर विद्यार्थीनीची प्रकृती बरी नसल्याने आई-वडिलाकडे गेली असता तिच्या मूळ गावी तिचा मृत्यू झाला आहे.

(२) नाही.

(३) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांच्या कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीत वसतिगृह प्रशासनाचा हलगर्जीपणा आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे व रत्नागिरी जिल्हयातील आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत

**(२०) ३५६२ (०३-०४-२०२०). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य व केंद्र शासनाकडून आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यास केंद्र व राज्य शासनाने मिळून ५० हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्हयातील ३५० तसेच रत्नागिरी जिल्हयातील १५० लाभार्थी जोडप्यांना अर्थसहाय्यीत रक्कम देण्यात न आल्यामुळे ही लाभार्थी जोडपी गेल्या दीड वर्षापासून अर्थसहाय्य मिळण्यापासून वंचित राहिलेली असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासानाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त जिल्हयातील लाभार्थी जोडप्यांना अर्थसहाय्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२१-०९-२०२०) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) आंतरजातिय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना ही योजना केंद्र पुरस्कृत असून या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५० टक्के या प्रमाणात निधी प्राप्त होतो. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याशिवाय राज्य शासनाकडून राज्य समरूप हिस्सा वितरीत करता येत नाही. सबब या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून ५०% केंद्र हिस्सा प्राप्त होताच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापुर जिल्हयातील वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळण्याबाबत**

**(२१) ३८७२ (०३-०४-२०२०). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर जिल्हयातील १०० टक्के कर्ज परतफेड करणाऱ्यां १३० संस्थांतील सुमारे ४० हजार खातेदारांना राज्य शासनाने घोषीत केलेल्या महात्मा फुले कर्जमाफी योजनेचा लाभ होणार नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर प्रकरणी नव्याने घोषीत केलेल्या कर्जमाफी योजनेचा जिल्हयातील किती शेतकऱ्यांना लाभ होणार असून त्यांची बँक व संस्थानिहाय संख्या किती आहे,
(३) असल्यास, योजनेपासून वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२१-०९-२०२०) :** (१) अंशतः खरे आहे.
कोल्हापूर जिल्हयातील एकूण १५८ संस्थामधील सर्वसाधारण १९६९९ खातेदारांची १०० टक्के कर्जवसूली आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत थकीत कर्जखातेधारकांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येतो.

(२) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यातील बँकनिहाय लाभार्थी खातेदारांची संख्या खालील प्रमाणे आहे

| अ.क्र. | राष्ट्रीयकृत बँकेचे नाव | सभासद संख्या |
|---|---|---|
| १ | अलाहाबाद बँक | १९ |
| २ | आंध्रा बँक | ०७ |
| ३ | बँक ऑफ बडोदा+ देना बँक + विजया बँक | ७६६ |
| ४ | बँक ऑफ इंडिया | ८३०५ |
| ५ | बँक ऑफ महाराष्ट्र | २९३९ |
| ६ | कॅनरा बँक | ३९६ |
| ७ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ८५ |
| ८ | कोर्पोरेशन बँक | ४३७ |
| ९ | आयडिबीआय बँक | १३१५ |
| १० | इंडियन ओव्हरसीज बँक | ०९ |
| ११ | ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स | १२३ |
| १२ | पंजाब अँड सिंध बँक | ०६ |
| १३ | स्टेट बँक ऑफ इंडिया | १५९० |
| १४ | सिंडिकेट बँक | ७० |
| १५ | युको बँक | ०३ |
| १६ | युनियन बँक ऑफ इंडिया | ३७५ |
| १७ | अॅक्सीस बँक | १३ |
| १८ | फेडरल बँक | १८५ |
| १९ | एचडिएफसी बँक | १६ |
| २० | आयसीआयसीआय बँक | ८३१ |
| २१ | आरबीएल बँक | ४९१ |
| २२ | विदर्भ कोकण ग्रामिण बँक | २५५ |
| २३ | कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ३२३७८ |
| २४ | सुभद्रा लोकल एरीया बँक | ०४ |
| एकूण | | ५०६१८ |

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड कोल्हापूर अंतर्गत एकुण १६२८ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेतील ३२३७८ इतके सभासद सदर योजनेस पात्र आहेत.

(३) अल्पमुदत पीक कर्ज व अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुनर्गठीत / फेरपुनर्गठीत कर्ज यांची रु. २.०० लाखापेक्षा जास्त थकबाकीची रक्कम असलेल्या खातेदारांना तसेच अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या खातेदारांना योग्य समर्पक योजनेद्वारे दिलासा देण्यासाठी दिनांक १५.०१.२०२० च्या शासन निर्णयाद्वारे मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांची होत असलेली गैरसोय**

**(२२) ४०५६ (०३-०४-२०२०). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक १२ जानेवारी, २०२० वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसतीगृहातील विद्यार्थी गैरसोयीमुळे मानसिक तणावाखाली असून विद्यार्थ्यांना दमदाटी करणे तसेच वसतीगृहातून काढून टाकण्याच्या धमक्या वसतिगृहाच्या गृहपालांकडून वारंवार देण्यात येत आहेत व विद्यार्थ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०४-०९-२०२०) :** (१) होय.
(२) प्रवेशित विद्यार्थ्यांनी गृहपाल वसतिगृहात येत नसून सोयी-सुविधांकडे दुर्लक्ष करीत असल्याची तक्रार केली आहे.
(३) होय.

चौकशीअंती संबंधित गृहपालांचा अतिरिक्त कार्यभार काढून घेण्यात आला आहे. तसेच त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित असून सदर वसतिगृहाचा कार्यभार अन्य गृहपालाकडे सोपविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय घटकामधील युवक-युवतींसाठी शासकीय वसतीगृह मंजूर करण्याबाबत**

**(२३) ४३४७ (०३-०४-२०२०). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली (जि.अमरावती) तालुक्यातील मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय घटकांमध्ये अनेक गोर-गरीब विद्यार्थी युवक-युवती पदवी व उच्च शिक्षण घेत असून आर्थिक परिस्थिती अभावी खेडे गावातून शिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी व जिल्हयाच्या ठिकाणी भाड्याने घर घेऊन शिक्षण घ्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त तालुक्यात युवक-युवतींचे शासकीय वसतीगृह मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०९-१०-२०२०) :** (१) होय.

(२) राज्यात सर्व तालुक्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे. ज्या तालुक्यांमध्ये वसतिगृह नाही तेथे वसतिगृह मंजूर करण्याबाबत तपासणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत**

**(२४) ४४८४ (०३-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **सामाजिक न्यायअ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना केंद्र व राज्य शासन मार्फत ५० हजार रुपये अनुदान देण्यात येत असून गेल्या दोन वर्षापासून सोलापूर जिल्हातील २०७ जोडपी या विवाह प्रोत्साहन अनुदान पासून वंचित असल्याचे निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या वतीने अनुदान आले नसल्याने राज्य शासनाचे अनुदान लाभार्थ्यांना वितरीत करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासानाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सोलापूर जिल्हयातील लाभार्थी जोडप्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२१-०९-२०२०) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) आंतरजातिय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना ही योजना केंद्र पुरस्कृत असून या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५० टक्के या प्रमाणात निधी प्राप्त होतो. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याशिवाय राज्य शासनाकडून राज्य समरूप हिस्सा वितरीत करता येत नाही. सबब या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून ५०% केंद्र हिस्सा प्राप्त होताच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वनविभागाने (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे लावलेल्या झाडांच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(२५) ५३२० (०२-०४-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वनविभागाकडून (ता.मालेगांव, जि.नाशिक) एकाच जागेवर दोन वेळा वृक्ष लागवड करुन शासनाची फसवणुक केल्याची बाब माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोपे निर्मितीसाठी लागवड व संगोपन यासाठी चार वर्षात एकट्या मालेगाव तालुक्यातील खर्च कोट्यवधीत झाला असुन प्रत्यक्ष क्षेत्रावर जीवंत रोपांसबंधी दिशाभुल करणा-या शासन नोंदी केल्या जात आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचा अनुषंगाने संबधित दोषीविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०५-१०-२०२०) :** (१) हे खरे नाही.

प्रत्येक रोपवनाच्या अक्षांश, रेखांश नोंदी घेतल्या जात असल्यामुळे एकाच जागेवर दोन वेळा वृक्ष लागवड करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा ज्योतीराव फुले कर्जमुक्त योजनेच्या माहितीसाठी भ्रमणध्वनीवर पाठविण्यात आलेल्या प्रशिक्षण चित्रफितीच्या लिंकमध्ये झालेली छेडछाड**

**(२६) ५४०८ (०५-०४-२०२०). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतीराव फुले कर्जमुक्ती योजनेची राज्यात अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा क्युट्योरियल व्हिडीओ (प्रशिक्षण चित्रफित) शेतकऱ्यांच्या माहितीसाठी भ्रमणध्वनीवर पाठविण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या भ्रमणध्वनीतील चित्रफितीच्या लिंकमध्ये छेडछाड झाल्याचे समोर आल्याने या गंभीर घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२१-०९-२०२०) :** (१) होय.

(२) अंशतः खरे आहे.

योजनेच्या माहितीपटाच्या ध्वनीचित्रफितीची लिंक संक्षिप्त संदेशाद्वारे शेतकऱ्यांच्या माहितीसाठी भ्रमणध्वनीवर पाठविण्यात आली होती.

(३) व (४) होय.

सदर प्रकरणी दिनांक २१.०१.२०२० रोजीच्या आदेशाद्वारे तत्कालीन प्रभारी सहकार आयुक्त व निबंधक यांना शासकीय सेवेतून तात्काळ निलंबीत करण्यात आले होते.

याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्यात येत असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबत

**(२७) ५८४६ (०५-०४-२०२०). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात शासनाच्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेअंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या सन २०१८-१९ पासून १५० जोडप्यांनी अनुदानासाठी प्रस्ताव दाखल करुन ही निधी उपलब्ध नसल्याने प्रोत्साहन अनुदान देण्यात आले नसल्याची बाब माहे जानेवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेअंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना ५० हजार रुपयांचे अनुदान तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (२१-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आंतरजातिय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना ही योजना केंद्र पुरस्कृत असून या योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून ५०:५० टक्के या प्रमाणात निधी प्राप्त होतो. केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याशिवाय राज्य शासनाकडून राज्य समरूप हिस्सा वितरीत करता येत नाही. सबब या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून ५०% केंद्र हिस्सा प्राप्त होताच प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील. केंद्र हिश्श्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास विभागामार्फत (जि.यवतमाळ) येथे अनुसुचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र कार्यालय सुरु करण्याबाबत

**(२८) ६३८७ (०२-०४-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभाग मार्फत (जि.यवतमाळ) परिसरातील आदिवासीना अनुसूचित जामाती जातवैधता प्रमाणपत्र मिळावे याकरिता यवतमाळ येथे कार्यालय सुरू करण्याचे पाच महिन्यांपूर्वी आदेश देऊनही त्याअनुषंगाने शासन निर्णय काढण्यात आला परंतु कार्यालय सुरु झाले नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास यवतमाळ येथे कार्यालय मंजुर होऊन सुरू करण्यात आले नसल्याने परिसरातील आदिवासी विदयार्थी व नागरीकांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन जात वैधता प्रमाणपत्र कार्यालय सुरु करण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**ॲड. के.सी.पाडवी (०६-१०-२०२०) :** (१), (२), (३) व (४) सध्या अस्तित्वात असलेल्या आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्याकडील प्रलंबित प्रकरणांची संख्या विचारात घेवून दि. १३/०९/२०१९ च्या शासन निर्णयान्वये सात नवीन अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून यामध्ये यवतमाळ तपासणी कार्यालयाचा समावेश आहे. सदर अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी कार्यालय कार्यरत करण्यासाठी इमारत, साधनसामुग्रीची उपलब्धता तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सध्या असलेल्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती कार्यालयाकडून यवतमाळ जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या दाव्याची तपासणी करण्यात येत आहे.

---

**गारगाई आणि पिंजाळ या दोन नविन धरणांच्या निर्मितीकरिता होणारी वृक्षतोड**

**(२९) ६५२७ (०३-०४-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराला पाणी पुरवठा करण्याकरिता गारगाई आणि पिंजाळ ही दोन नविन धरणे बांधण्याकरिता २ आर हेक्टर वन जमिन बाधित होणार असल्याने लाखो वृक्षांची तोड होणार असल्याचे माहे जानेवारी, २०२० रोजी च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या धरणांकरिता ज्या वृक्षांची तोड होणार आहे त्या वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. संजय राठोड (२९-०९-२०२०) :** (१) मुंबई शहराला पिण्याचे पाणी पुरवठा करण्याच्या उद्देशाने गारगाई नदीवर धरण बांधण्याकरीता वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेने ६४४.९०७ हेक्टर वनक्षेत्र वळतीकरणाचा प्रस्ताव दिनांक २७/०६/२०२० रोजी ऑनलाईन पद्धतीने वन विभागास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावात १८९.९२ हेक्टर वनेत्तर क्षेत्राचा समावेश आहे. प्रस्तावित धरणाचे बुडीत क्षेत्र सुमारे ६,४८,१४२ वृक्षतोड होणार असल्याचे प्रस्तावित आहे.

प्रकल्प यंत्रणेकडून हार्ड कॉपी मध्ये सविस्तर प्रस्ताव व तपशील प्राप्त झाल्यानंतर प्रकल्पाकरीता नेमकी किती वृक्षांची तोड संभावित आहे याची निश्चिती होईल.

(२) व (३) सदर प्रकल्पात तानसा अभयारण्यातील क्षेत्र अंतर्भूत असल्याने वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अनुसार राज्य वन्यजीव मंडळ तसेच राष्ट्रीय वन्यजीव मंडळ या प्राधिकरणांची पूर्व मान्यता आवश्यक राहील. उक्त दोन्ही अधिनियमांतर्गत सक्षम प्राधिकरणांची औपचारीक मान्यता प्राप्त झाल्यानंतर व मान्यतेत घातलेल्या अटी व शर्तीनुसार प्रभावित होणा-या वृक्षांचे संदर्भात विहित उपाययोजना करण्यात येईल.

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सर्वसाधारणपणे वळती होणा-या वनक्षेत्राइतके पर्यायी जमीन व सदर जमिनीवर वृक्षलागवड करण्यासाठी पर्यायी वनीकरणाचा संपूर्ण खर्च प्रकल्प यंत्रणेकडून उपलब्ध करुन देण्यात येते आणि उक्त जमिनीवर पर्यायी वनीकरण करण्यात येत असते.

---

**वरप गावा (ता.कल्याण, जि.ठाणे) वन क्षेत्रात वृक्ष लागवडीत झालेला गैरव्यवहार**

**(३०) ६५२८ (०२-०४-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरप गावात (ता.कल्याण, जि.ठाणे) राधास्वामी आश्रमच्या मागील बाजूस असलेल्या वन क्षेत्रात दिनांक १ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास केलेल्या वृक्ष लागवडीत गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२२-०९-२०२०) :** (१) व (२) अशा आशयाच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या. तथापी सदर प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.

सन २०१८ च्या पावसाळयात १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत वरप (ता.कल्याण, जि.ठाणे ) येथे ९००० रोपांची लागवड करण्यात आलेली आहे. यासाठी पुर्वपावसाळी कामाकरीता रोपवन या बाबीसाठी रु.९,९२,६५२ इतक्या अंदाजपत्रकीय तरतूदीपैकी रु.८,०६,८६९/- इतका खर्च झालेला आहे. तसेच प्रथम वर्षीय कामासाठी करण्यात आलेल्या रु.१४,६३,७६५/- इतक्या अंदाजपत्रकीय तरतूदीचा संपूर्ण खर्च झालेला आहे.

अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार पूर्व पावसाळी व प्रथम वर्षीय कामांवर उपरोक्त प्रमाणे खर्च करण्यात आला असून द्वितीय वर्षापासून रोपवनाचे संगोपन, देखभाल, परिरक्षण करण्यात येत आहे. सदर रोपवनातील जिवंत रोपांची टक्केवारी माहे ऑक्टो, २०१९ मध्ये ८७.२४% आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ३३ कोटी वृक्षलागवड योजने अंतर्गत सातपुडा पर्वतामध्ये होणाऱ्या कामांमध्ये निविदा प्रकियेत झालेला गैरव्यवहार

**(३१) ७३३४ (०५-०४-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ३३ कोटी वृक्षलागवड योजने अंतर्गत सातपुडा पर्वतामध्ये होणाऱ्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० रोजी वा मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ३३ कोटी वृक्षलागवड योजनेंतर्गत निविदा प्रकियेत पैसे घेऊन ठेकेदारास काम देण्यात आले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने सबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०५-१०-२०२०) :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने (महाजनको) कोराडीतील (जि.नागपूर) निकामी संच विक्रीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३२) ८८४३ (०२-०६-२०२०). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने (महाजनको) कोराडीतील निकामी झालेले संच विक्रीमध्ये गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाजनकोच्या अधिकाऱ्यांनी निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करुन २५० कोटी रकमेची ४६५ मेगावॅट क्षमतेचे संच काम मिळविण्यासाठी धनविजय रिरोलिंग इंजिनिअरिंग वर्क्स या कंपनीला केवळ ६०.६० कोटी रुपयात विकले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी एमएसटीसीमार्फत सदर लिलाव करताना घातलेल्या जाचक अटींमुळे जास्त कंपन्याना यामध्ये सहभाग घेता आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लिलावात बदल करुन चारही संच कमी किंमतीत विकून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२१-०९-२०२०) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या संचालक मंडळाने दि. २८.०२.२०१२ रोजी ठरावान्वये सदर संच सुमारे ४५ वर्षापेक्षा जास्त जुने असल्याने व त्यातील तंत्रज्ञान जुने झाले असल्याने या संचाचा नवीन ठिकाणी पुर्नवापर करणे आर्थिकदृष्टया योग्य नसल्याने कोराडी येथील निकामी झालेले (४x१२०/१०५) मे.वॅ. क्षमतेचे ४ संच ई-लिलाव प्रक्रियेव्दारे विकण्याचा ठराव पारित केला. त्यानंतर दि.३०.११.२०१६ रोजी ई-लिलावाव्दारे सदर संचाची विक्री प्रक्रिया करण्यात आली. मे. सनविजय रोलिंग ॲण्ड इंजिनिअरींग लि. या एकच कंपनीने सदर लिलावामध्ये भाग घेवून रु.६०.६० कोटीचे कमाल बोली लावली.

ही बोली मान्य करण्याबाबत महानिर्मिती संचालक मंडळाने ठराव क्र. २०१७/२१६७ दि.०१.०३.२०१७ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सदर संचाची किमंत खालील प्रमाणे ग्राहय धरण्यात आली.

संचाची किमंत-रु.६०.६० कोटी

मुल्यावर्धित कर १३.५% - रु. ०८.१८ कोटी

त्यानुसार सर्वात जास्त बोलीदारालाच हे जुने संच विकण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**उस्मानाबाद जिल्हयात सामाजिक वनीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(३३) ९०५३ (०२-०६-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील सामाजिक वनीकरणाच्या कामामध्ये दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ ऑगष्ट, २०१९ या कालावधीत ११ लाख ५० हजार रुपयांच्या शासकीय निधीचा, काम न करताच बनावट कागदपत्रांच्या आधारे गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी विभागीय वन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करून तत्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समितीने अद्यापपर्यंत चौकशी करून अहवाल सादर केला नाही तसेच चौकशीस विलंब करीत असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापूर्वीही माहे जुलै २०१९, मध्ये वा त्यादरम्यान रोपवाटिकेच्या कामासाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीचा मोठ्याप्रमाणावर गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहु प्रकरणी सबंधित दोषींविरोधात तसेच चौकशी अहवाल सादर करण्यास विलंब करणाऱ्या सबंधित अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०८-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांनी सहायक वन संरक्षक, उस्मानाबाद यांना चौकशीचे आदेश दिले होते. त्यानुसार सहायक वन संरक्षक, उस्मानाबाद यांनी चौकशी करुन चौकशी अहवालानुसार चौकशीत काहीही तथ्य आढळून आलेले नाही.

---

**टाळेबंदीमुळे औरंगाबाद ते मध्य प्रदेश पायी जाणाऱ्या १६ मजुरांचा**
**रेल्वे रुळावर झालेला अपघात**

**(३४) १०२२० (०२-०६-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील सळई निर्मिती कारखाना टाळेबंदीमुळे बंद पडल्याने मध्य प्रदेशात पायी जाण्यासाठी निघालेल्या १६ मजुरांचा करमाठजवळ रेल्वे रुळावर अपघात होऊन मृत्यु झाल्याची घटना दिनांक ८ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदरहू घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास सदरहू मृत कामगारांच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०९-०९-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) सदरहू घटनेची दंडाधिकारी मार्फत चौकशी करण्यात आली असून त्याचा निष्कर्ष खालीलप्रमाणे आहे :-

जालना जिल्हयातील एस. आर. जे. पित्ती स्टिल प्रा. लि. आणि भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल प्रा. लि. येथे काम करणारे १६ मजूर हे दिनांक ७ मे, २०२० रोजी पासून जालना येथून रेल्वे रूळावरून पायी निघाले होते. सदरील मजूर लॉकडाऊन कालावधीमध्ये कंपनी बंद असल्याने व कुठलेही रोजगार नसल्याने स्वगृही मध्यप्रदेश येथील मूळगावी परत जाण्यासाठी वाहतुकीचे कुठलेही साधन नसल्यामुळे रेल्वे रूळावरून औरंगाबाद मार्गे भुसावळच्या दिशेने जिल्हा प्रशासनाला पुर्वसूचना न देता विना परवानगी पायी निघाले होते. दिनांक ७ मे, २०२० रोजी सायंकाळी ७.०० वा. मौजे सटाणा ता.जि.औरंगाबाद (बदनापूर व करमाड रेल्वेस्टेशनच्या मध्ये) पोहचले. पायी चालून थकल्यामुळे सर्वजण तेथेच रेल्वे रूळावर झोपले होते. दिनांक ८ मे, २०२० रोजी सकाळी ०५.०२ वा. रेल्वे मालगाडी क्र.बीटीपीएल/ई बदनापूर रेल्वे स्थानकावरून निघाली. त्यानंतर काही अंतरावरून रेल्वे चालक (लोको पायलट) यास रेल्वे रूळावर काही व्यक्ती झोपलेले अवस्थेत दिसल्याने त्यांनी तात्काळ हॉर्न वाजविले तसेच इर्मजन्सी ब्रेक लावले परंतु तो पर्यंत रेल्वे थांबू न शकल्यामुळे सदरील मजूर रेल्वेखाली येवून त्यांचा मृत्यू झाला. सदरील घटना ही केवळ एक अपघात असून कोणतीही त्रयस्थ व्यक्ती या घटनेस जबाबदार नसल्याचे दंडाधिकारी यांनी चौकशीत निष्कर्ष नोंदविला आहे.

(३) सदरहू १६ कामगारांच्या कायदेशीर वारसांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी रू.५.०० लक्ष इतकी आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्यातील मध्य चांदा वनविकास महामंडळाच्या बल्लारपूर वनप्रकल्पाअंतर्गत झालेला गैरव्यवहार**

**(३५) १०४९४ (०७-०६-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील मध्य चांदा वनविकास महामंडळाच्या बल्लारपूर वनप्रकल्पाअंतर्गत विरळणापूर्वी स्वच्छतेची कामे केल्याचे दाखवून लाखो रूपयांची देयके विरळणानंतर मंजूर करून घेतल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वनविकास महामंडळाच्या झरण, कन्हाळगांव, तोहोगांव व धाबा वनपरिक्षेत्रातील हजारों हेक्टरमधील विरळणाची कामे मंजूर करण्यात आली असून विरळणापूर्वी स्वच्छतेची कामे पूर्ण होणे अनिवार्य असल्याची बाब अंदाजपत्रकात नमूद असूनही ती न करताच काम केल्याचे दर्शविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हजेरी पटावर बनावट मजूर दाखवून या प्रकरणात मोठा गैरव्यवहार झाल्याची तक्रार वनविकास महामंडळाच्या उच्चाधिका-यांकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०९-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) मात्र दि.२०.०५.२०२० चे दै.पुण्यनगरी वृत्तपत्रात “कन्हाळगाव परिक्षेत्रात मजूरांच्या मजूरीवर वनअधिकाऱ्यांचा डल्ला” या मथळ्याखाली प्रकाशीत बातमीची दखल घेऊन विशेष अधिकारी नेमून चौकशी केली असता, प्रस्तुत प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झालेला नसल्याचे सिध्द झाले.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वनविभाग महामंडळ वनक्षेत्र कन्हाळगाव (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर)**
**येथे रेतीचा अवैध उपसा होत असल्याबाबत**

**(३६) १०८३३ (०३-०६-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वनविभाग महामंडळ वनक्षेत्र कन्हाळगाव (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) मधील कक्ष क्रमांक १३९ मधील नाल्यातून संचारबंदीचे नियम तोडुन हजारो ब्रास रेतीचा अवैधरीत्या उपसा सुरु असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करून अवैधरीत्या रेतीचा उपसा करणाऱ्या रेती तस्करांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०९-०९-२०२०) :** (१) होय. अंशत: खरे आहे.

वन विकास महामंडळ मध्य चांदा वनप्रकल्प विभागात कन्हाळगाव-२ वनपरिक्षेत्रात कक्ष क्रमांक १३९ मधील नाला परिसरात दि.०१.०५.२०२० रोजी पहाटे वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक यांनी वन व वन्यजीव संरक्षणार्थ गस्त करताना नाल्यातून अवैध रेती उत्खनन केली जात असल्याची बाब निदर्शनास आले असता, त्याबाबत तात्काळ दखल घेऊन मुद्देमाल व आरोपी यांचेवर कायदेशीर कारवाई केली आहे. सदर अवैध उत्खननामध्ये रेतीची मात्रा हजारो ब्रास नसून ३४.९० ब्रास रेती आहे.

(२) कन्हाळगाव-२ परिक्षेत्रातील कक्ष क्रमांक १३९ मधील नाल्यातून रेती तस्करी करणाऱ्या दोन ट्रॅक्टरचालक व इतर आरोपींवर भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६(१) ड व ग, कलम ४१, कलम ५२ (१) नुसार प्रथम वन गुन्हा क्र.६५/३२३२, दि.०१.०५.२०२० दाखल करुन ट्रॅक्टर-ट्रॉली रेतीसह वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक जप्त करुन पुढील चौकशी एक आठवड्याच्या कालावधीत पूर्ण केली व चौकशी अहवाल सहायक व्यवस्थापक-२ तथा प्राधिकृत अधिकारी, मध्य चांदा वन प्रकल्प विभाग, बल्लारशाह यांचेकडे सादर केले. प्राधिकृत अधिकारी यांनी भारतीय वन अधिनियम १९२७ मधील कलम ६८ नुसार आरोपीबाबत व गुन्ह्यातील वापरलेल्या वाहन व इतर साहित्याबाबत अंतिम आदेश पारित केले असून वनोपज महामंडळाकडे ताब्यात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील घरकामगारांना तातडीने आर्थिक सहाय्य देण्याबाबत

**(३७) ११३२७ (१७-०८-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करोना मुकाबला करण्यासाठी गेल्या तीन महिन्यांपासून राज्यात लागू असलेल्या टाळेबंदीमुळे घरकाम करून उदरनिर्वाह करणाऱ्या सुमारे साडेचार लाख कामगार व त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असल्याचे दिनांक ६ जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये महिला कामगारांची संख्या सर्वाधिक असून घरकामगारांच्या कल्याणासाठी कायदा अस्तित्वात असतांना अशा आपत्कालिन परिस्थितीत संबंधित प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामगार महिलांना १० लाख रुपयांचे आरोग्य जीवन विमा कवच, २ लाख रुपयांचे आरोग्य उपाय विमा व पुढील ६ महिन्यासाठी प्रति महिना १५००० मदत देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी शासनाला निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घरकामगारांना आर्थिक मदतीसाठी दिनांक २२ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास राज्य शासनाने एक समिती स्थापन केली असून सदरहू समितीने अद्यापही अहवाल शासनास सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुषंगाने घरकामगारांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२५-०९-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम, २००८ च्या कलम ३ अंतर्गत राज्यस्तरीय घरेलू कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्यात आले
असून सदर मंडळामार्फत केंद्र शासन/ राज्य शासन पुरस्कृत योजना राबविण्यात येतात.
(४) घरकामगारांना आर्थिक मदत करण्यासाठी कोणतीही समिती स्थापन करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोकणातील निसर्ग चक्रीवादळातील बांधिताना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(३८) ११३३२ (१५-०७-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राजेश पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात विशेषत: रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यात झालेल्या निर्सग चक्रीवादळामुळे किनारपट्टी भागातील फळबागायतदार, शेतकरी, मच्छिमारांचे व स्थानिक रहिवाश्यांचे जवळपास ३४०० कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातील बागायती क्षेत्र व त्यातील झाडांची संख्या विचारात घेता जमीनदोस्त झालेल्या एक हेक्टरमधील नारळाच्या व सुपारीच्या झाडांची घनता पाहता एका नारळाच्या झाडाला ४० रुपये व एका सुपारीच्या झाडाला २० रुपये इतकी किंवा गुंठा ५०० रुपये इतकी अत्यल्प नुकसान भरपाई मिळणार असल्याने बागायतदारांना प्रति हेक्टरी मदत न करता प्रती वृक्ष मदत जाहिर करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील दापोली व मंडणगड या दोन तालुक्याचे सर्वात जास्त नुकसान झाले असून जिल्हयात नुकसान झालेल्या २७ हजार ७८२ घरांपैकी ९३ % घरे दापोली व मंडणगड तालुक्यातील आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणातील नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत काय, उक्त सर्वेक्षणानुसार शेतकरी, मच्छिमार व स्थानिक रहिवाश्यांचे एकूण किती नुकसान झाले आहे व त्यानुषंगाने नुकसानग्रस्तांसाठी केंद्र व राज्य शासनातर्फे किती निधी मंजूर करण्यात आला आहे,
(५) असल्यास, चक्रीवादळामुळे कोकणातील झालेले नुकसान पहाता नुकसानग्रस्तांना शासनाने जाहिर केलेली आर्थिक मदत ही तुटपुंजी असल्याने ती वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०९-०९-२०२०) :** (१) होय.
(२) बहुवार्षिक पिकाच्या नुकसानीसाठी प्रति हेक्टरी रूपये ५०,००० या दराने २ हेक्टरच्या मर्यादेत मदत अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच सुपारी व नारळ या बहुवार्षिक पिकांच्या संपूर्णत: नष्ट झालेल्या झाडांना सुपारी रू.५० प्रती झाड व नारळ रू.२५० प्रती झाड याप्रमाणे मदत अनुज्ञेय करण्यात आलेली आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे.
रत्नागिरी जिल्हयामध्ये ४५२४१ घरांचे, ७१ झोपडयांचे, व २६८० गोठ्यांचे नुकसान झाले असून जिल्हयातील एकूण नुकसानग्रस्त घरांपैकी ८४ घरे ही मंडणगड व दापोली येथील आहेत.
(४) निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण किनारपट्टीतील जिल्हयामधील नुकसानीबाबत पंचनामे करण्यात आलेले आहेत. शेतकरी, मच्छिमार व स्थानिक रहिवाश्यांचे रू. ६०४८.३१ कोटी एवढे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. राज्य शासनाने राज्य आपत्ती प्रतिसाद निधी दराच्या वाढीव दराने मदत अनुज्ञेय केली असून आतापर्यंत रू. ६१३.७९ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे रू. १०६५.५८ कोटी एवढया निधीच्या मागणीकरिता दिनांक १७.०७.२०२० रोजी केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली वनविभागात होत असलेली अवैध बांबु तोड

**(३९) ११७२२ (१९-०७-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयात पेसा कायद्याअंतर्गत ग्रामसभांना मिळालेल्या सामूहिक वनहक्काचा दुरुपयोग करून बांबूची मोठ्या प्रमाणात तोड करून त्याची अवैध मार्गाने विक्री केल्याची घटना दिनांक २४ जुन, २०२० रोजी वा त्यासुमारास मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक वनवृत्त गडचिरोली यांच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्यानुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच वनहक्काचा दुरुपयोग होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपायोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१०-०९-२०२०) :** (१), (२) व (३) संवर्ग विकास अधिकारी, कोरची यांनी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा मार्गदर्शन व तक्रार समिती यांना मोठाझेलीया येथे अवैध बांबुतोड झाल्याची तक्रार केली असून, त्याची एक प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) गडचिरोली यांना दिनांक १०.०७.२०२० रोजी प्राप्त झाली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग यांनी स्वतंत्र चौकशी अधिकारी नेमून चौकशी केली आहे. त्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालामध्ये याप्रकरणी बांबू तोडीचे आदेश मौ.मोठाझोलीया ग्रामसभेने दिलेले आहेत. तसेच तक्रारकर्ते मोठाझेलीयाचे सरपंच व ग्रामकोष अध्यक्ष यांनी गैरसमजुतीने तक्रार केलेली असल्याचे कबुल केलेले आहे. त्यामुळे याबाबतची तक्रार ही अनावधानाने झालेली असून, त्यात काहीही तथ्य आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खामगांव (जि.बुलढाणा) येथे शासकीय कापूस खरेदी सुरु न केल्याबाबत

**(४०) ११८३८ (१७-०८-२०२०). अॅड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगावं (जि.बुलढाणा) येथे भारतीय कपास निगम लि. (सी.सी.आय) यांनी ८ जिनींग फॅक्टरी सोबत कापूस खरेदी बाबत करार केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्तपैकी केवळ ६ जिनींग फॅक्टरीने नियमीत कापूस खरेदी सुरु केली परंतु इतर २ जिनींग फॅक्टरींनी कापूस खरेदी सुरु न केल्यामुळे विहीत कालावधीमध्ये शेतकऱ्यांना अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २ जिनिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला फॅक्टरी सुरु न केल्यामुळे दिनांक १९ मे, २०२० रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून करारनाम्याचा भंग केल्याप्रकरणी दिनांक २ जून, २०२० रोजी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी गुन्हे दाखल करण्याबाबत आदेश दिले आहेत तसेच त्यांच्याविरुद्ध शासकीय कापूस खरेदी न केल्या प्रकरणी गुन्हा नोंद करणे बाबत जा.क्र.वि ४/कापूस खरेदी/ जिनिंग फॅक्टरी / बंद /१६६३ /२०२० दि. २/६ /२०२० रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था खामगाव यांना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बुलढाणा यांनी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हाधिकारी यांचे आदेश असताना ही दिनांक ३ जून, २०२० रोजी पुन्हा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बुलढाणा यांनी राजकीय दबावाखाली येऊन यांचे पत्र क्र जा.क्र. वि.४/कापूसखरेदी/जिनिंग फॅक्टरी/ बंद/१६९०/२०२० नुसार सदरचे गुन्हे दाखल न करण्याबाबत आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त संपुर्ण प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोरोना सदृश्य परिस्थितीत शेतकऱ्यांचा नोंद केलेला कापूस मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी येत असूनसुद्धा त्यांचा कापूस खरेदी न करणे या बाबीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०५-१०-२०२०) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

खामगाव कापूस खरेदी केंद्रावर कापूस खरेदी होत नसल्याबाबत जिल्हा उपनिबंधक, बुलढाणा या कार्यालयाला कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसून, ०६ जिनिंग प्रेसिंग फॅक्ट्रींमध्ये कापूस खरेदी सुरु होती.

(३) होय, हे खरे आहे.

(४) नाही, हे खरे नाही.

सदर जिनिंग फॅक्ट्री यांनी दिनांक १ जून २०२० रोजी च्या पत्रान्वये त्यांना मजुरांची उपलब्धता झालेली असल्याचे कळवून व त्यानुसार दिनांक ०३/०६/२०२० पासून सुगोसा जिनिंग प्रा.लि. व दिनांक ०४/०६/२०२० पासून जय शाकंभरी जिनिंग प्रा.लि. येथे कापूस खरेदी प्रक्रिया पूर्ववत चालू झालेली असल्याने, जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्यासोबत उपनिबंधक सहकारी संस्था, बुलढाणा यांनी चर्चा केल्यानंतर सदरचे गुन्हे दाखल न करणेबाबत पत्र देण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोळखांब (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील उपवनसंरक्षक कार्यालयाच्या अधिपत्याखालील वनपरिक्षेत्र हद्दतील बांधकामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(४१) ११९१५ (१८-०७-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोळखांब (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील उपवनसंरक्षक कार्यालयाच्या अधिपत्याखालील वनपरिक्षेत्र हद्दतील बांधकामे निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थांनी संबधित अधिकाऱ्यांकडे केली असल्याची बाब दिनांक १२ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहापूर, खर्डा, वाशाळा, धसई, डोळखांब येथील निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत स्थानिक ग्रामस्थांनी तक्रार करुनही संबंधित अधिकारी जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वनपरिक्षेत्र कार्यालयाअंतर्गत करण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१०-०९-२०२०) :** (१) तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) व (३) तक्रार फक्त डोळखांब बाबत प्राप्त झाली आहे. डोळखांब वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपाल हिंगळोद यांनी तक्रारदार व स्थानिक ग्रामस्थ यांचे समवेत कामाचे अंदाजपत्रक तसेच कामाबाबत प्रत्यक्ष स्थळावर जावून चौकशी केली आहे. त्यावेळी तक्रार केलेल्या ग्रामस्थानी जबाब व पंचनामा सादर करुन झालेले बांधकाम हे उत्कृष्ट दर्जाचे असून अंदाजपत्रकानुसार करण्यात आले आहे. तसेच याबाबतची तक्रार गैरसमजूतीने केल्याचे कबूल केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयातील बंगाली कास्तकारांना अतिक्रमणाचे पट्टे मिळण्याबाबत

**(४२) ११९४५ (१३-०९-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे गडचिरोली जिल्हयातील बंगाली पुनर्वसीत शेतकऱ्यांना शासनाच्या धोरणाप्रमाणे अतिक्रमण केलेल्या जागेचे मालकी हक्क (पट्टे) माहे जून, २०२० पर्यंत प्राप्त झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयात केंद्र शासनाच्या पुनर्वर्सन विभागाकडून भारतीय वन अधिनियम १९७२ चे कलम २७ नुसार सन १९६४ ते १९७१ पर्यंत राखीव वने निर्वणीकरण करुन २५५५६ हे. आर. जमीनीपैकी एकूण ११००० हे.आर. जमीन शेतीकरीता व ४००० हे.आर. जमीन सार्वजनिक उपयोगाकरीता वाटप करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील वन विभागाच्या जमिनीपैकी उर्वरीत पडीक वन जमीनीवर अनेक बंगाली पुर्नवसीत कुटूंब १९७०-७१ पासून अतिक्रमण करुन आपल्या कुटूंबाचे उदारनिर्वाह करीत असल्याबाबतच्या नोंदी महसूल विभागातील रेकॉर्डवर असून सन १९९१ नंतर त्या नोंदी बंद करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सर्व अतिक्रमणधारकांनी महसूली पुराव्यासह सर्व कागदपत्र माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यानच्या गडचिरोली जिल्हयातील महसूल अधिकाऱ्यांच्या नोटीसप्रमाणे जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेकडे सादर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाच्या धोरणाप्रमाणे अतिक्रमण धारकांना मालकी हक्क मिळण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत, तसेच या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**श्री. संजय राठोड (०५-१०-२०२०) :** (१) व (२) सन १९६५ मध्ये बंगाली निर्वासित लोकांच्या पुनर्वसनासाठी ब वर्ग राखीव क्षेत्रापैकी २५५५६.४० हे. आर वनक्षेत्राचे दिनांक १५.७.१९६५ रोजीच्या शासन अधिसूचनेव्दारे निर्वणीकरण करण्यात आले आहे. सदर निर्वणीकरण करण्यात आलेल्या क्षेत्रापैकी १६५७२.१२ हे.आर क्षेत्र बंगाली निर्वासित लोकांच्या राहण्यासाठी तसेच शेतीसाठी वाटप करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या क्षेत्रावर ४४ गावे अस्तित्वात आहेत.
(३) व (४) नमूद ४४ गावांपैकी ३१ गावांच्या सिमेअंतर्गत असलेले ८९८४.३३ हे.आर क्षेत्र शासन अधिसूचना दिनांक ८.११.१९९० अन्वये भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अतंर्गत राखीव वन म्हणून घोषित करण्यात आले आहे. तसेच सदरचे क्षेत्र भारतीय अधिनियम, १९२७ चे कलम २० अंतर्गत अंतिमत: राखीव वन म्हणून घोषित करण्यासाठी वन जमाबंदी अधिकारी, नागपूर यांच्याकडून चौकशी आदेश पारित करण्यात आले आहेत.

सदर चौकशी आदेशांविरुद्ध ३० गावातील गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम १७ नुसार अपील सादर केले आहेत. सदर प्रकरणात जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी दिनांक २७.१२.२०१९ रोजी अंतिम आदेश पारित केले असून वन जमाबंदी अधिकारी, नागपूर यांनी पारित केलेले आदेश रद्द करुन अपीलार्थ्यांनी नमूद केलेल्या बाबींची तपासणी होवून आदेश पारित करण्याबाबत कळविले आहे.
(५) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी वन अधिकारांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ च्या तरतुदीनुसार २००५ पुर्वीचे अतिक्रमण धारकांच्या क्षेत्राला वन हक्क प्रदान करण्याचे नमूद आहे. तथापि, सदर कायद्याच्या तरतुदीमध्ये गैर आदिवासी वन हक्क धारक स्थानिक तीन पिढीपासून रहिवासी असणे गरजेचे आहे. तथापि, सदर अतिक्रमण धारकांजवळ तीन पिढ्यांचा गैर आदिवासी रहिवाशी पुरावा नसल्यामुळे म्हणजेच ७५ वर्षापुर्वीचे रहिवासी नसल्यामुळे उक्त अधिनियमांतर्गत वन जमिनीचे मालकी हक्क मान्य करण्यात आलेले नाहीत.

---

**गडचिरोली जिल्हयातील विविध विकासकामांसाठी लागणारी वन विभागाच्या नाहरकत प्रमाणपत्राची अट शिथील करण्याबाबत**

**(४३) ११९८० (१३-०७-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयाचे भौगोलीक क्षेत्र मोठे असून अत्यल्प लोकसंख्या असलेले आदिवासी पाडे व गावे यांना बारमाही सोयी सुविधा देण्याच्या दृष्टीने त्यांना रस्ते व पुलाने जोडणे अत्यंत आवश्यक असून वन विभागाच्या जाचक अटीमुळे सदरहु कामांना अतिविलंब होत असल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाच्या जाचक अटीचे उल्लंघन झाल्यास वन विभागाने अनेक अधिकारी, कर्मचारी व कंत्राटदार यांच्यावर गुन्हे दाखल केल्याने जिल्हयातील विकासकामे करण्यास अधिकारी व कंत्राटदार यांच्या मध्ये अनास्था निर्माण झालेली असून त्यांचा परिणाम विकासकामांवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन विकास जलदगतीने करण्याकरीता वन विभागाच्या जाचक अटी शिथील करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१५-०९-२०२०) :** (१) व (२) गडचिरोली जिल्हयातील ७७.०१ % क्षेत्र हे वनक्षेत्र असल्याने वनक्षेत्रातील रस्त्यांची कामे करण्यासाठी प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यात प्रस्ताव सादर करणे आवश्यक असते. सदर प्रस्तावास केंद्र / राज्य शासनाची पूर्व परवानगी आवश्यक असते. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अस्तित्वात येण्यापूर्वी म्हणजेच दि.२५.१०.१९८० पूर्वी वनक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचे अस्तित्वातील रूंदीमध्ये डांबरीकरण व अद्ययावतीकरण करण्यास परवानगी देण्याचे अधिकार केंद्र शासनाने राज्य शासनास प्रदान केले आहेत. रस्ते, कालवे, पारेषण वाहिन्या इ. प्रकारचे एकरेषीय प्रकल्प जलदगतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सक्षम प्राधिकरणाच्या तत्वत: मंजूरीनंतर आवश्यक अटींची पूर्तता केल्यास वन विभागामार्फत वृक्षतोड परवानगी व काम सुरू करण्याची परवानगी देण्यात येते. याव्यतिरिक्त अनुसूचित जमाती व इतर परंपरागत रहिवाशी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३ (२) अंतर्गत गावाला जोडणा-या नवीन जोड रस्त्याकरीता जर ७५ पेक्षा जास्त वृक्षतोड होणार नसेल तर १ हे. च्या मर्यादेत परवानगी देण्याचे अधिकार संबंधित उपवनसंरक्षक यांना आहेत. त्यांतर्गत गडचिरोली जिल्हयातील विविध रस्त्यांच्या कामांसाठी वनजमीन वळती करण्यास परवानगी देण्यात आली आहे. अशा प्रकारे गडचिरोली जिल्हयातील प्रकल्पांसाठी वन मंजूरी मिळण्याची प्रक्रिया सोपी करण्यात आली आहे. तथापि, काही वेळी वन विभागाकडे मंजूरीसाठी परिपूर्ण दस्ताऐवजासह प्रस्ताव सादर न करता कंत्राटदाराच्या नावे कार्यारंभ आदेश काढल्यानंतर कंत्राटदाराकडून काही ठिकाणी वनक्षेत्रामध्ये रस्त्याच्या कामाकरिता मुरुम, माती, दगड इ. बेकायदेशीररित्या उत्खनन करण्यात आल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकरणांमध्ये वन विभागाकडून संबंधित कंत्राटदाराविरूध्द वनगुन्हे नोंदविले जातात. यामध्ये कोणत्याही शासकीय यंत्रणेच्या अधिका-यांवर वनगुन्हा नोंदविण्यात आलेला नाही.
(३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी यांनी दि.१७.०२.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये वन (संवर्धन) अधिनियम, १९८० लागू होण्यापूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची दुरूस्ती व डांबरीकरण करण्यासाठी वन विभागाची परवानगी मिळण्यासाठी कशा प्रकारे प्रस्ताव सादर करावयाचा याबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. सदरचे राज्यस्तरावरील अधिकार अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना प्रदान करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कांदा तालुकास्तरावरुन कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फत नाफेडकडून खरेदी होणेबाबत

**(४४) १२०६७ (१५-०७-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेली तीन वर्षापासून कांदयाला बाजारभाव नसल्याने शेतकरी हवालदिल असताना यावर्षी कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे तसेच यावर्षी झालेली अतिवृष्टी, ढगाळ हवामान यांमुळे कांदयाचे उत्पन्न कमी व निर्यात बंदीमुळे कांदयाच्या दरात घट झाली असल्याच्या तक्रारी कांदा उत्पादक शेतकरी व त्यांच्या संघटनांनी माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदयाचे भाव स्थिराविण्यासाठी व शेतकर्‍यांना परवडणारा भाव मिळण्यासाठी प्रत्येक तालुका स्तरावर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मार्फत नाफेडकडून १५ ते २० रुपये दराने कांदा खरेदी करणेबाबत शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे,

(३) तसेच कांद्याचा उत्पादन खर्च हा सुमारे १ हजार रुपयांपर्यत येत असल्याने कांद्याच्या सतत कोसळलेल्या दरामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी आली असल्याचे दि.१९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्याने कांदा उत्पादक शेतकरी व शेतकरी संघटनांनी कांद्यास किमान २ हजार रुपये दर मिळावेत अशी मागणी पणन मंत्री, प्रधान सचिव, पणन विभाग मंत्रालय व संचालक मार्केटिंग फेडरेशन यांचेकडे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने उत्पादक शेतकर्‍यांना दिलासा देऊन नाफेडमार्फत कांदा खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२५-०९-२०२०) :**१) दरवर्षी कांद्याचे उत्पादन व मागणी आणि मान्सूनचा पाऊस यानुसार कांद्यांच्या दरात चढउतार होत असतात. सन २०१६-१७ वगळता २०१५-१६ व २०१७-१८ मध्ये माहे ऑक्टोंबर ते जानेवारीपर्यत शेतकऱ्यांना कांद्याचे सरासरी दर किमान रुपये ११५० प्रति क्विंटल व कमाल रुपये २७३६ प्रति क्विंटल प्राप्त झाले आहेत. सन २०१९-२० मध्ये तर माहे ऑगस्ट ते मार्च पर्यत कांद्याचे चांगले दर प्राप्त झाले आहेत. मार्च, २०२० मध्ये कोविड-१९ या संसर्गजन्य रोगामुळे देशात लॉकडाऊन लागू केल्यामुळे, कांदा पुरवठा साखळीत निर्माण झालेल्या अडचणीमुळे देशांतर्गत तसेच निर्यातीच्या बाजारपेठेवर मोठा परिणाम झाल्याने कांद्याच्या घाऊक दरात घट झालेली आहे.

(२) नाफेडकडून कांदा खरेदी करण्याची मागणी अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांनी संगमनेर कृषी उत्पन्न बाजार समितीकडे केली आहे.

(३) व (४) सन २०१९-२० मध्ये माहे ऑक्टोंबर, २०१९ ते जानेवारी २०२० या कालावधीत देशांतर्गत बाजारपेठेत मागणी व पुरवठा यामध्ये बरीच तफावत आल्याने, देशांतर्गत

बाजारपेठेतील कांद्यांचे दर स्थिर ठेवण्यासाठी केंद्रशासनाने निर्यात बंदी लागू केली होती. तसेच इजिप्त व तुर्कस्थानमधून कांदा आयात करुन, दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. दिनांक १५ मार्च, २०२० पासून कांद्यांवरील निर्यातबंदी मागे घेतली आहे.

केंद्र शासनाच्या किंमत स्थिरीकरण योजनेंतर्गत ग्राहकांना किफायतशीर दरात कांदा उपलब्ध करण्यासाठी नाफेडमार्फत चालू बाजारभावाने दरवर्षी कांदा खरेदी केली जाते. सन २०२०-२१ मध्ये नाफेड विभागीय कार्यालय, नाशिककडून मे २०२० च्या पहिल्या आठवडयापासून कांदा खरेदी सुरु करण्यात आली आहे. खरेदीचा लक्षांक ८०००० मे.ट. असून आतापर्यत ५५००० मे.ट.कांदा सरासरी रुपये १०५० ते ११०० दराने खरेदी केलेला आहे. नाफेडमार्फत कांदा खरेदी सुरु केल्यानंतर बाजार समितीमध्ये कांद्याची आवक वाढली असून सरासरी बाजार भावाच्या दरामध्ये वाढ झालेली दिसून येते.

तसेच केंद्र शासनाच्या MEIS या योजनेमध्ये कांद्याचा समावेश करुन ५% अनुदान मंजूर करण्याची मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली (ता.किनवट जि.नांदेड) येथे अवैधरित्या सागवान तस्करी होत असल्याबाबत**

**(४५) १२६३६ (१८-०८-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (ता.किनवट. जि.नांदेड) येथे वन व महसूल विभागाच्या पथकाने छापा टाकून २१ ट्रक सागवान जप्त केल्याची बाब दिनांक २ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छाप्यात गावातील घरात टिनपत्रावर, शेतात साठवून ठेवलेले सागवानाचे पलंग, सोपासेठ, डायनिंग टेबल, चौकटी, पाट्या, गोलमाल इत्यादी फर्निचर जप्त केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जप्त केलेल्या मालाचा लिलाव करुन मालाची रक्कम शासनाकडे भरणा केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अवैधरित्या सागवानाची तस्करी करणाऱ्यावर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या वन विभागातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०८-०९-२०२०) :** (१) चिखली (ता.किनवट जि.नांदेड) येथे वन विभागाने पोलीस विभाग व महसूल विभागाचे अधिकारी/ कर्मचारी तसेच राज्य राखीव दलाचे कर्मचारी यांच्या सहकार्याने दिनांक २.२.२०१९ रोजी संयुक्तरित्या छापा टाकून एकूण २४.४२७ घनमिटर इतका सागी माल जप्त करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (५) उपरोक्त प्रकरणी २१ आरोपीविरुध्द २१ वनगुन्हे नोंदविण्यात आले असून सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ट आहे. सदर मालाचा लिलाव करण्याची परवानगी मा.न्यायालयाकडे मागण्यात आलेली आहे. सदरील धाडीमधील जप्त सागी माल राजगड वनोपज विक्री आगारावर ठेवण्यात आलेला आहे. सदर प्रकरणातील आरोपींना वनाधिकारी/कर्मचारी यांनी सहकार्य केल्याचे आढळून आले नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयात सामाजिक वनीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४६) १२६८० (१९-०७-२०२०). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील सामाजिक वनीकरणाच्या कामामध्ये दिनांक १ एप्रिल २०१९ ते ३१ ऑगष्ट २०१९ या कालावधीत काम न करताच बनावट कागदपत्रांच्या आधारे ११ लाख ५० हजार रुपयांच्या शासकीय निधीचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी विभागीय वन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करून तत्काळ अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी समितीने अद्यापपर्यंत चौकशी करून अहवाल सादर केला नाही तसेच चौकशीस विलंब करीत असल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यापूर्वीही माहे जुलै २०१९, मध्ये वा त्यादरम्यान रोपवाटिकेच्या कामासाठी वितरीत करण्यात आलेल्या निधीचा मोठ्याप्रमाणावर गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहु प्रकरणी सबंधित दोषींविरोधात तसेच चौकशी अहवाल सादर करण्यास विलंब करणाऱ्या सबंधित अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०८-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) अशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्याने विभागीय वन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती नियुक्त करुन तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेमार्फत देण्यात आले होते. तथापि, विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद यांनी सहायक वन संरक्षक यांना चौकशीचे आदेश दिले होते. सहायक वनसंरक्षक यांनी तत्पूर्वीच चौकशी करुन चौकशी अहवाल दिनांक ०३.०७.२०२० रोजी सादर केलेला आहे. सदर चौकशी अहवालानुसार चौकशीत काहीही तथ्य आढळून आलेले नाही.

---

**विदेशी गुंतवणूकदारांसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष कृती दलाबाबत**

**(४७) १२९१८ (१४-०७-२०२०). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण जगभरात कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव वाढला असून मोठ्या संख्येने विविध विदेशी कंपन्या चीनमधून बाहेर पडून अन्य देशांत गुंतवणूक करणार असल्याने राज्यात विदेशी गुंतवणूकदारांना उद्योग उभारण्यासाठी आकर्षित करण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदेशी गुंतवणूकदारांना आपल्या राज्यात उद्योग उभारण्यासाठी कृती दलाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मोठ्या संख्येने विदेशी गुंतवणूकदार राज्यात आल्यास, त्यांना आवश्यक मनुष्यबळ व अन्य सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१८-०९-२०२०) :**(१) कोविड-१९ विषाणु प्रादुर्भावाच्या पश्चात अर्थव्यवस्थेला गती देण्याकरिता राज्यातील औद्योगिक गुंतवणुक वाढ व्हावी व अस्तीत्वातील उद्योगांना चालना देण्याकरीता विविध उपाय योजना राज्य शासनाने हाती घेतल्या आहेत.

(२), (३) व (४) या अनुषंगाने खालीलप्रमाणे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत:-

* महापरवाना, नवीन औद्योगिक प्रकल्पासाठी ४८ तासात सर्व परवाने देण्याची प्रणाली विकसीत करण्यात येत आहे.
* MIDC कडून प्लग अॅड प्ले इन्फ्रास्ट्रक्चर आणि भाडेतत्वावर शेडची तरतूद.
* विशिष्ठ देशांशी व्यापार करणाऱ्या संस्थांच्या सहकार्याने त्या देशांसाठी खास समर्पित कक्षाची स्थापना.
* गुंतवणुकदारांच्या सोयीसाठी संपर्काचे माध्यम म्हणून रिलेशनशिप मॅनजरची नेमणुक.
* औद्योगिक रोजगार ब्युरो म्हणून काम करण्यासाठी महाजॉब्ज पोर्टल.
* मुंबईत स्थापित केलेल्या विविध देशांच्या वाणिज्य दूतावासांसोबत सतत संपर्क.
* इन्व्हेस्ट इंडिया आणि डीपीआयआयटी बैठकांमध्ये सहभाग. उद्योगात गुंतवणुक वाढीसाठी सीआयआय आणि फिक्कीसह बैठक आयोजित करणे.

---

### कोळी महादेव जमातीला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याबाबत

**(४८) १२९२३ (१५-०९-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाचे संकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र/ ५५३ मावक-५ दिनांक २६ सप्टेंबर २००८ चे शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गाची यादी प्रसिद्ध केली आहे, हे खरे आहे काय,

(२) उक्त शासन निर्णयामध्ये अनुक्रमांक ४ अंतर्गत १४ व्या क्रमांकावर अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेल्या कोळी समाजाचा समावेश विशेष मागास प्रवर्गात करण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जमातीमध्ये राज्यातील कोणत्या कोळी समाजाचा समावेश करण्यात आला आहे,

(४) असल्यास,अकोला व अमरावती जिल्हयातील तत्कालीन बेरार प्रांतातील महादेव कोळी यांचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०६-१०-२०२०) :** (१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २६ सप्टेंबर, २००८ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्याची अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गाची यादी शासनाच्या संकेतस्थळावर टाकण्यात आली आहे.

(२) सदर पत्रासोबतच्या विशेष मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये अनुक्रमांक ४ येथे १४ व्या क्रमांकावर "अनुसूचित जमातीमध्ये समावेश नसलेले कोळी" असा उल्लेख आहे.

(३) केंद्र शासनामार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या यादीमधील महाराष्ट्र राज्यासाठीच्या यादीमध्ये अ. क्र. २८ वर कोळी ढोर, टोकरे कोळी, कोलचा, कोलघा, अ. क्र. २९ येथे कोळी महादेव, डोंगर कोळी व अ. क्र. ३० येथे कोळी मल्हार या जमातींचा समावेश करण्यात आलेला आहे.

(४) व (५) सन १९७६ मध्ये क्षेत्रबंधन उठविल्यात आल्यानंतर अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये विभाग अथवा प्रांतनिहाय कोणत्याही जमातीचा स्वतंत्र उल्लेख करण्यात आलेला नाही. तसेच सदर यादीमध्ये कोळी महादेव असा उल्लेख आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा, (जि.अहमदनगर) तालुक्यातील मौजे वडगांव शिदोडी, माठ, राजापूर क्र.२, म्हसे, राजापूर क्र.१, दाणेवाडी या प्रकल्प बाधित गावचे गावठाणांचे पुनर्वसनाबाबत**

**(४९) १३०३९ (१३-०९-२०२०). श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील मौजे वडगांव शिदोडी, माठ, राजापूर क्र.२, म्हसे, राजापूर क्र.१, दाणेवाडी या प्रकल्प बाधित गावचे गावठाणांचे पुनर्वसन केल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त गावांचे पुनर्वसन होऊनही अद्यापही सोई- सुविधा उपलब्ध करुन दिल्या नसल्याचेही निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, तदनुसार चौकशीत काय निष्पन्न झाले

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गावांना सोई -सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता शायनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (२५-०९-२०२०) :** (१) हे खरे नाही. घोड प्रकल्प हा सन १९५४ मध्ये बांधण्यात आला आहे. घोड धरणामुळे अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील मौजे वडगांव शिदोडी, माठ, म्हसे, राजापूर, दाणेवाडी ही गावे प्रकल्प बाधित झालेली आहेत. सदर प्रकल्प हा १९७६ पूवीचा आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. पुनर्वसित सर्व गावात काही नागरी सुविधा उपलब्ध आहेत.

(३), (४) व (५) घोड प्रकल्पांतर्गत अहमदनगर जिल्हयातील श्रीगोंदा तालुक्यातील मौजे वडगांव शिदोडी, माठ, राजापूर क्र. २, म्हसे, राजापूर क्र. १, दाणेवाडी ह प्रकल्प बाधित गावे आहेत. मौजे वडगांव शिदोडी येथील ग्रामस्थांनी वन जमिनीवर गावठाण वसविले आहे. सदर प्रकल्प १९७६ पूवीचा असल्याने, त्यास पुनर्वसन अधिनियम लागू नव्हता. त्यामुळे गावठाणाचा रेखांकन आराखडा तयार करणे व तद्नंतर भूखंड वाटप करणे अशी कार्यवाही झालेली दिसून येत नाही. सदरचे क्षेत्र वन विभागाचे असल्यामुळे त्या ठिकाणी कोणतीही नागरी सुविधा कामे करता आलेली नाहीत. वन विभागाकडून सदर जमिन पुनर्वसनासाठी हस्तांतरित करण्यासाठी नेट प्रेझेंट व्हॅल्यूचा व पर्यायी वनीकरण अशी एकूण रक्कम रुपये १,०५,९६,६६१/- इतकी कळविलेली आहे. सदर नेट प्रेझेंट व्हॅल्युचा प्रस्ताव जिल्हा यंत्रणेने दि. २६.११.२०१३ अन्वये, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय यांना सादर केलेला आहे. उक्त गावठाणांसाठी नागरी सुविधा पुरविण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे.

---

## औरंगाबाद जिल्हयातील मागासवर्गीय वसतिगृहांमध्ये मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(५०) १३१२४ (२१-०७-२०२०). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्यायअ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी समाज कल्याण विभागातर्फे ५५ वसतिगृहांना मंजुरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर वसतिगृहांमध्ये मूलभूत सोयी-सुविधा न देणे, निकृष्ट दर्जाचे जेवण, अपुऱ्या जागेत १०-१५ विद्याथांना वास्तवास ठेवणे, तसेच अस्वछ प्रसाधनगृह अशा अनेक प्रकारच्या तक्रारी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वसतिगृहांमध्ये अनेक प्रकारच्या समस्या व सोयी सुविधांचा अभाव असून शासनामार्फत पुरविले जाणारे अनुदान वसतीगृहापर्यंत पाहोचत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने औरंगाबाद जिल्हयातील मागासवर्गीय वसतिगृहांना अनुदान उपलब्ध करुन सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (३१-०८-२०२०) :** (१) होय.

५५ अनुदानित वसतिगृहांना मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) व (३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **सचिव**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.